**एक वरदान ...**

लहानपणी आपण गोष्टी ऐकायचो कि..एक राजा असतो ,तो तपःश्चर्या करतो आणि त्याला देव प्रकट होतो आणि म्हणतो, "मी तुझ्यावर प्रसन्न झालो आहे तेंव्हा कोणताही वर माग. " हाच देव तुम्हा आम्हाला प्रसन्न झाला आणि म्हणाला "कोणतीही अशी एक गोष्ट माग मी देईन तुला ". विचार करा अशी एकच गोष्ट मागायची आहे की जेणेकरून आपले आयुष्य सोपे सहज होऊन जाईल. ज्या वयात आपला गोष्टींवर विश्वास असतो त्या वयात मला हा प्रश्न पडला होता आणि मी विचार करायची माझ्यासमोर देव उभा राहिला आणि विचारले कि "तुला काय हवे ते माग " तर आपण काय मागायचे ते आधीच ठरवून ठेवूया म्हणजे पटकन सांगता येईल. आयत्या वेळेस गडबड नको ना व्हायला .आणि मी हुडकलेले उत्तर किंवा मागायचा वर ठरविला होता तो म्हणजे "ज्या कोणत्या गोष्टी मी करेन त्यात मला यश मिळावे" थोडा विचार केला तर एक गंमत लक्षात येईल , पहा जे काही कराल त्यात यश मिळणे म्हणजे जादू ची कांडी फिरणार की नाही. परीक्षेतील यश म्हणजे पुढील शिक्षण सोपे कारण हव्या त्या कॉलेज मध्ये प्रवेश मिळाला, गाणे शिकत असेंन त्यात यश म्हणजे उत्कृष्ट गाता येणे. गाण्याच्या स्पर्धेत भाग घेतला तर त्यामध्ये ही नंबर , मुलाखतीचे यश म्हणजे जॉब मिळाला , व्यवसाय करायला घेतला त्यात यश मिळाले म्हणजे म्हणजे नफा ,आर्थिक प्रश्न सुटले .थोडक्यात सगळ्या गोष्टी आपसूक मिळणार.एकच वरदान असे मागितले की बाकी हव्या असणाऱ्या सगळ्या गोष्टी मिळणार . मग असे वरदान हवे ना आपल्याला? चला तर मग आता जाणून घेऊ हे वरदान आपण कसे मिळवायचे . वरदान देणारा देव प्रकट होणे आधी गरजेचे बरोबर . त्या आधी देव प्रसन्न झाला पाहिजे आणि त्याच्या हि आधी आपली तपःश्चर्या झाली पाहिजे . गोष्टीतून बाहेर पडून चालू परिस्थितीस पटेल असा अर्थ लाऊया .

मला यशस्वी व्हायचे आहे हे मनाशी पक्के ठरले पाहिजे तर मग आपण तपःश्चर्या करायला तयार होणार . देव तपःश्चर्या पूर्ण झाल्यावर प्रसन्न होतो पण तपःश्चर्या करायला आधी स्वतः प्रसन्न होणे गरजेचे आहे .तपःश्चर्या करणे म्हणजे नक्की काय ? एखाद्या कार्टून किंवा चित्रात पाहीले तर एका पायावर उभे राहून नामस्मरण करणारे ऋषी दिसतील. 12 वर्षे जप करत बसलेले ऋषी आहेत आणि त्यांच्या भोवती वारूळ तयार झालेले असे ही चित्र पाहीले असेल. अशा पद्धतीची तपःश्चर्या आपल्याला करायची नाहीच मुळी. ह्या चित्रांचा किंवा कल्पनेचा अर्थ असा आहे की आजूबाजूला काय चालू आहे ह्याचा विसर पडणे, हातात असलेल्या कामाशी 100 % एकरूप होणे. तहान भूक हरपून वेळेचे ही भान न उरणे. काहीही झाले तरी काम (अभ्यास ,गाण्याचा सराव ,खेळाचा सराव ,मुलाखतीचीतयारी,स्वयंपाक करणे इत्यादी ) करताना मन विचलित न होणे .काम पूर्ण झाल्याशिवाय न थांबणे . स्वतःला झोकून देऊन काम करणे .उद्दिष्ट्य सफल होईतोपर्यंत काम चालू ठेवणे.काहीही झाले तरी आपल्या निश्चय कायम ठेवणे .मधून पळ न काढणे . काम पूर्ण झाल्यावरच देव संतुष्ट होतो . देव म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून आपणच आहोत, हातात घेतलेले काम पूर्ण झाल्यावर दुसरा कोणी खूष होवो न होवो पण आपण खूष झालेलो असतो. आपण केलेल्या अभ्यासावर ,लिहिलेल्या पेपरवर ,आपल्या खेळावर ,आपल्या भाषणावर ,आपल्या कामावर आपण

समाधानी असणे हे सगळ्यात महत्वाचे .आपण आपल्याला दिलेल्या ह्या प्रशस्ती पत्रिकेची किंमत करताच येत नाही.

करसहाय्यक परीक्षेत महाराष्ट्रात पहिला आला हे समजल्यावर कोणताही विद्यार्थी खूष होणार. तसा विनायक पाटील पण खुश झाला महाराष्ट्रात पहिला म्हणून त्याचा जगाने सत्कार केला , मानसन्मान त्या विनायक पाटीलला मिळाला.नौकरी त्यालाच मिळाली पर्यायाने अर्थार्जन होणार. पद ,प्रसिद्धी आणि पैसा हे एका परीक्षेच्या निकालाने त्या विद्यार्थ्यास मिळाले. पण ह्या निकालाच्या आधी त्याने केलेली तपःश्चर्या समजावून घेणे तितकेच महत्वाचे . तपःश्चर्या फळाला यायला हवी ह्या साठी काही कौशल्ये विकसित होणे गरजेचे असते . किंवा तपःश्चर्या करणे म्हणजेच यशस्वी होण्यासाठी योग्य दिशा , अचूक मार्गदर्शन याच बरोबर काही तंत्र, काही कौशल्य ह्याचा जाणीवपूर्वक विकास करवून घेणे होय .

असे म्हणाले जाते की “You can never climb ladders of success with hands in your pockets”

ह्याचा अर्थ काही प्रयत्न न करता यशस्वी होणे कदापि शक्य नाही. आता प्रश्न मनात उभा असेल की खरंच मी मला ,माझ्या मनाला प्रसन्न करून ह्या प्रवासावर चालून यशस्वी होईन का ? उत्तर आहे .."होय..हे शक्य आहे . . Success is yours .प्रत्येकजण हे वरदान प्राप्त करून घेऊ शकतो " नेमकी कोणती कौशल्ये विकसित करणे आवश्यक आहेत हे जाणून घेऊयात पुढील लेखात जसे की स्वयंशिस्त ,स्वयंप्रेरणा ,आत्मसन्मान ,आत्मविश्वास इत्यादी आणि मनाशी ठाम निश्चय करूयात " होय , मी जिंकणार ,यशस्वी होणार. काहीही झाले ,कसली ही परिस्थिती आली तरी यशाचे हे वरदान मीच मला मिळवून देणार मीच मला मिळवून देणार. "

प्राचार्या शिल्पा देगांवकर

princianf@gmail.com